REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला' कथासंग्रहातील लिंगभाव समानता

**प्रा.विष्णुपंत म. इंगवले**

**सहाय्यक प्राध्यापक , श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली.**

## प्रस्तावना :




मराठी साहित्यविश्वात आपल्या दमदार व आश्वासक लेखनीने दीर्घकथा लिहिणाऱ्या मेघना पेठे यांनी आपल्या अनुभवाशी प्रामाणिक राहून मानवी जीवनातील विविधांगी अनुभवांच्या व स्त्री-पुरुष समस्यांच्या तळाशी जाऊन स्त्री- पुरुषांच्या जाणीवेतील व नेणिवेतील विविध रुपे शोधताना दिसतात.

१९९० च्या सुमारास कथा लेखनाला सुरुवात केली. त्यांचे आजपर्यंत 'हंस अकेला' आणि 'आंधळयाच्या गायी' असे दोन कथासंग्रह प्रकशित झाले आहेत. त्यापैकी 'हंस अकेला' या कथासंग्रहातील स्त्री-पुरुषांचे विविधांगी दु:ख, एकटेपणा, लिंगभाव समानतेच्या संदर्भात सामाजिकतेच्या अंगाने विचार करता, स्त्री-पुरुष लिंगभाव समानता शोधण्याच्या मानस या शोधनिबंधाचा आहे.

प्रथमः 'हंस अकेला' कथासंग्रहातील कथांच्या आशयाचा विचार करता 'कॉलनी' या कथेतील नायिका एका चाळीतून मध्यमवर्गीय फ्लॅट मध्ये राहायला येते.मुंबई शहरात ऑफिसमध्ये क्लार्कची नोकरी. शिवाय रिकामं आयुष्य भरुन काढण्यासाठी मोकळ्या वेळात अपंग व निराधार मुलांच्या संस्थेत कारकुनी करणारी स्त्री. परंतु ऑफिस मधील साहेब, त्या साहेबांचे इतर स्त्रियांना जसे अनुभव येतात, तसे अनुभव नायिकेला येतात. हरप्रकारे वश करण्याचा प्रकार साहेबांकडून घडतो व नीतीमत्तेचा बुरखा पांघरणारी ही पुरुष मंडळी प्रसंगी हिंस्त्र का होतात ? 'सी...सॉ...' या कथेत 'माई' ही जन्मापासून अनाथ. पण ते अनाथ पण लग्नाने संपेल असे वाटते. परंतु नवऱ्याकडून गुलामीची वागणूक मिळते. मिळवता मुलगा अचानक निघून जातो. आणि माई एकट्या परिस्थितीमुळे नात्यामुळे कडवट बनलेल्या स्त्रीची व्यथा असह्य करुन जाते. 'कोल्ह्याचं लगीन' या कथेतील नायिका 'मंजुळाबाई' मुंबईच्या झोपडपट्टीत राहणारी. धुणी भांडी करण्याची वेळ, कारण नवरा रिक्षा चालवायचा, अचानक लकवा भरला, नवरा घरी, दवाखाना, उदरनिर्वाह साधनासाठी, मोलकरणीचे काम. अशुतोष बॅनजीच्या घरी, धुणी, भांडी करता करता. अशुतोषच्या प्रेमाची शिकार बनते. आणि तीही शारीरिक भूक भागवून घेते. यातून अतृप्त कामवासना शमविणे... 'हो आवे लाग' या कथेतील नायिका केसकर ही खेड्यातून नोकरीसाठी मुंबईला येते. मामाकडे राहते. नोकरी करते, वर्तक खोली शोधून देतो. आणि वर्तकाच्या शारीरिक भूकेला बळी पडते. वर्तकाचा मृत्यू होतो. नंतर गिझरे च्या जाळ्यात सापडते गर्भ ठेवते.

या कथांच्या आशयाचा विचार करता स्त्री आणि पुरुषांच्या जीवन जाणिवेतील विविध समस्या, विविध प्रश्न, अगतिकता, एकटेपणा, नात्यातून दुरावलेपण यातून स्त्री- पुरुष समानता दिसते का ? तर नाही. समाजात असे का होताना दिसते ? या संदर्भात पेठेंनी जो आशय मांडला ह्या संदर्भात प्रदीप कर्णिक म्हणतात 'एका स्त्रीनं इतक स्पष्ट, सरळ भिडणारे स्त्री-पुरुष संबंधाचे वर्णन करणे मराठी कथेला नविन आहे.' या लेखिकेने मराठी साहित्यात धाडसाने पाऊल टाकून आपले अस्तित्व तर निर्माण केले. स्त्री या नात्याने स्त्री-पुरुषातील लिंगभाव समानतेच्या विषमतेतून वेगवेगळी रुपं आकार घेऊ लागली.

सर्वच कथांतून स्त्री-पुरुष संबंधाचे नैसर्गिक, वेडे वाकडे, देखणे, कुरुप, या सर्व प्रकारच्या रुपांना चित्रित केलं. त्यात सर्व प्रकारचे संबंधही साकारतात. ते माणसाच्या जगण्यात जितक्या सहजपणे येतात, तितक्या सहजपणे व्यक्त झाले आहे. अविवाहित स्त्री स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासठी, जगण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी झगडत असताना, या समाजातील पुरुषांची ज्यांच्याकडे अधिकार, सत्ता, पद आहे. अशा सर्वांची शिकार बनावी ; हा स्त्री वर होणारा अन्याय आहे. म्हणून जे जे इतर सर्वांना मिळालेले आहे,ते सर्व मिळण्याचा अधिकार स्त्रीयांना आहे.त्यासाठी सांस्कृतिक लिंग निर्मिती प्रक्रियेमध्ये मुलगामी सुविधा हव्यात. लिंग-भेद भिन्नतेवरील भर कमी करून समानतेवर भर देणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्य, समता, निर्णय, क्षमता अजूनही भारतीय स्त्री पासून दूरच आहे. स्त्री ही एक प्रजनन क्षमता केंद्र म्हणून पाहिले जाते. त्यात परिवर्तन आहे. पुरुषसत्ताक संस्कृतीत अनेक स्त्रीया त्यांच्या वासनेला बळी पडलेल्या आहेत तर पुरुषी मन हा विकृतीचा परिणाम आहे. कारण प्रत्येकाच्या घरात स्त्री आहे. मग घरातून बाहेर पडल्यावर असे का घडताना दिसते ? असा ही प्रश्न निर्माण होतो आहे.

सी...सॉ... या कथेत तर संसार सुरु आहे. पण स्त्री च्या विचाराला निर्णय क्षमतेला संधी नाही. यातून होणारी कुचंबना हा मुद्दा विचारात घेतला तर. बदलत्या काळात स्त्रीयांना समान स्थान, समान दर्जा आणि निर्णय स्वातंत्र्य यांची नितांत आवश्यक आहे. सार्वत्रिक विचार करणयाची गरज वाटते. एकूणच आज समाजात जीवन जगताना स्त्रीयांचे जीवन या पुरोगामी भारतात तर सुरक्षित नाही, असे म्हणता येईल. कारण स्त्री वरील अन्याय हा आजचा अन्याय नसून तर प्राचीन काळापासून अन्याय सहन करणारी ही साहित्यिकांनी उपमा दिल्याप्रमाणे सर्व त्रास, जाच, दु:ख, वेदना इ. सर्व काही सहन करणारी धरणीच आहे. असं म्हणावसं वाटतं. जाच आहे, त्रास आहे, भांडण आहे, बंधन आहे, विघातक आहेत, असाक्षरता आहे. समाजाचा व समाजातील सर्वांचा स्त्री कडे बघण्याचा दृष्टिकोन आहे. तो म्हणजे प्रजनन क्षमता केंद्र. म्हणूनच अजूनही पाहिलं त्यात बदल अपेक्षित आहे. तरी पण आपल्या पुरोगामी काळातील भारत देश बुरखा पांघरलेला आहे. जोपर्यंत समाजात अमुलाग्र उन्नती होत नाही, परिवर्तन होत नाही, तो पर्यंत स्त्री-पुरुषसमानता नाही. असे म्हणावयास काही हरकत नाही.

त्यासाठी कायदे करून, नियम करून आपणास बदल अथवा परिवर्तन घडविता येईल. त्या संदर्भात विचार करता भृण हत्या बंदी कायदा आहे. पण हत्या मात्र चालू आहे. मुलगी नकोचा नारा समाजात सुरु आहे. त्या संदर्भात 'सिमान द बोव्हा' म्हणतात की "आपण स्त्री म्हणून जन्म घेत नसतो तर स्त्री बनत असतो." खरं तर मुलगी म्हणून जन्माला येतो पण स्त्री- पणाचे बाईपणाचे सर्व नियम हा समाजच निर्माण करीत असतो. त्यात भारत देश जेवढा श्रद्धाळू आहे, त्याचबरोबर त्याच्यापेक्षा जास्त अंधश्रद्धाळू आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

मुलीचं स्त्रीत रुपांतर होत असताना त्यांना लाजाळूपणा, भावनाप्रधानता, ममता स्वार्थ, त्याग, समर्पण इ. गुण नैसर्गिक येत असतात. परदेशात जैविक जैविक लिंगभेदासाठी आपण सेक्स असे गृहित धरतो. आणि सांस्कृतिक भेदासाठी 'जेंडर' या दोन संज्ञा इंग्रजीत रुढ आहेत. त्या संज्ञेच्या अनुषंगाने मेघना पेठे यांच्या कथांच्या आशयातील संदर्भाने विचार करता या देहरचनेच्या भेदामुळेच स्त्री-पुरुष विषमता मर्यादित आहे. परंतु संस्कृतीजन्य भिन्नता अथवा मानसिकता यातून निर्माण होणारी विषमता आपण बदलणे महत्वाचे आहे.

स्त्रियांवर झालेल्या जुलमाची मूळ कारणे कोणती ? एक ना अनेक कारणे सांगता येतील पण त्यामध्ये सांस्कृतिक लिंग प्रक्रियामध्ये मूलगामी सुविधा केल्या पाहिजेत. आणि भिन्नतेवरील भार कमी केला पाहिजे. स्त्रियांना त्यांच्या कायदेशीर हक्काची जाणीव, विकासाची व शिक्षणाची समान संधी दिली पाहिजे. विवाह संस्थात अमुलाग्र बदल अपेक्षित आहे. आणि तो समाजात रूजला पाहिजे.सांपत्तिक हक्काची जाणीव कायदा येऊ घातला आहे पण अमंलबजावणी ही झाली पाहिजे. वारसा हक्काची जाणीव रुजविली पाहिजे.पितृसत्ताकसंस्थेने स्त्रीवर लादलेले कनिष्ठत्व ,दुय्यमत्व, शून्यत्व दूर करणे ही काळाची गरज आहे. तरच त्यातून त्या स्वत:चे एक वेगळे स्त्री विश्व निर्माण करू शकतील. स्वत:चे अस्तित्व निर्माण करू शकतील.

'मेघना पेठे' यांची कथा याच दिशेने वाटचाल करताना दिसते. मुक्त जीवन, स्वातंत्र्य व स्वनिर्णय घेण्याची क्षमता स्त्रीमध्ये निर्माण होणे हा धाडसी निर्णय त्यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या अंगानेच घेतला. विशिष्ट कौटुंबिक परिस्थितीला, सामाजिक स्थितीला सामोरे जात असताना सामाजिक मूल्ये आणि मानवी संबंध यांच्या न्यूनत्वात अडकलेली आहे. त्याला सामोरे जाताना व्यक्ती-व्यक्तीच्या प्रतिक्रियांचे चित्रण, मानवी संबंधाचे पापुद्रे उलघडीत आजची स्त्री-पुरुषाचे अस्तित्व जोडून घेताना अपरिमित गुंते निर्माण केले जातात. त्यासाठी स्त्री -पुरुषातील सांकेतिकता प्रथमत: नाकारली पाहिजे. नैतिकतेचा दरारा बाजूला ठेवला पाहिजे. समाजाची मानसिकता मुळात बदलली पाहिजे. हीच भूमिका घेऊन कथा लेखन केले आहे.

स्त्री-पुरुष समानता भारतात रुजायलाच हवी पण ती लगेच क्षणात रुजणार नाही. त्यासाठी स्वत: प्रथमत: स्वत: पासून पुरुष असो, अथवा स्त्री असो, मनापासून मानव व माणूस हे नातं दोघांनी सतत ठेऊन तशा पद्धतीची बीजं स्वत: कुटुंबापासून रुजविणे, सुरुवात करणे गरजेचे वाटते. प्रत्येक समाजात अथवा कुटुंबात भिन्नतेची (लिंग) पातळी प्रथमत: नष्ट करणे गरजेचे आहे. स्त्री-पुरुष समानतेचा नारा प्रत्येक कुटुंबात होऊ लागले तरच समाजात समानता नांदू शकेल. स्त्री-पुरुष समानता ही काळाची गरज बनली आहे. पुरुष अपूर्ण आहे. स्त्री पण अपूर्ण आहे. जर का ? पुरुषाला अपूर्णातून पुर्णत्वाकडे जायचे असेल किंवा स्त्रीला जर अपूर्णाकडून पूर्णत्वाकडे जायचे असेल तर स्त्री-पुरुष समानता समाजात रुजली पाहिजे. तरच अपूर्णातून पुर्णत्वाचे गणित पूर्ण होऊ शकेल. भारतात स्त्री-पुरुष समानता गुण्यागोविंदाने नांदू शकेल.

## निष्कर्ष

- पितृसत्ताक पद्धतीत बदल व स्त्रियांना समान अधिकार.
- सार्वत्रिक जुलमाची विविध कारणे समजून समूळ नष्ट करणे.
- आत्मिक विकासासाठी समान संधी.
- स्त्रीचे गुण पुरुषकेंद्री किंवा कुटुंबकेंद्री असतात तर पुरुषाचे गुण हे स्वकेंद्री किंवा समाजकेंद्री.
- सांस्कृतिक लिंगभेद
- जैविक लिंगभेद म्हणजे सांस्कृतिक लिंगभेद नव्हे. जैविक लिंगभेद हा जननेंद्रिय व त्यांची कार्ये व त्याचा संबंध.

## संदर्भ ग्रंथ

१. पेठे मेघना ; हंस अकेला, राजहंस प्रकाशन, पुणे. प. आ. ११९७.
२. कर्णिक प्रदीप ; वृत्तमानस, १२ एप्रिल १९९८.
३. संत दु. का. ' मराठी स्त्री ',स्कूल व कॉलेज बुक स्टॉल सोलापूर, प. आ. १९५७.
४. राज्याध्यक्ष विजया, मराठी वाङमय कोश, खंड ४ था समीक्षा संज्ञा, म. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प. आ. २००२.
५. टाकसाळे मुकुंद, माणसाला पुरुन उरणारा एकटेपणा, साप्ताहिक सकाळ, ऑगस्ट १९९८.
६. भावे, पुष्पा, हंस अकेला, ललित, जुलै १९९८.
७. प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प. आ. (खंड २)



**प्रा.विष्णुपंत म. इंगवले**
**सहाय्यक प्राध्यापक , श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय, सांगली.**

LBP PUBLICATION